आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२१ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- राज्यसभेसाठी भाजपाकडून धैर्यशील पाटील आणि राष्ट्रवादीकडून नितीन पाटील यांचे  उमेदवारी अर्ज दाखल

- बदलापूर इथं कालच्या आंदोलनानंतर परिस्थिती सुरळीत / अफवा रोखण्यासाठी काही दिवस इंटरनेट सेवा बंद राहणार

- बदलापूरच्या लैंगिक अत्याचार प्रकरणाचा राज्यात विविध ठिकाणी निषेध

**आणि**

- राज्यशासनाच्या कृषी महोत्सवाचं आज परळी वैजनाथमधे उद्घाटन

**<><><><><>**

देशभरात राज्यसभेच्या १२ जागांसाठी पोटनिवडणूक होत आहे. महाराष्ट्रातून खासदार पियुष गोयल आणि उदयनराजे भोसले लोकसभेवर निवडून गेल्यामुळे रिक्त झालेल्या दोन जागांवर पोटनिवडणूक होणार आहे. उदयनराजे भोसले यांच्या जागी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून आज नितीन पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

काल भाजपानं रायगडचे माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या नावाची घोषणा केली. या दोघांनीही आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस असून पुढच्या महिन्याच्या ३ तारखेला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

बदलापूर इथं दोन लहान मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणी काल झालेल्या आंदोलनानंतर या भागातली परिस्थिती आणि रेल्वे वाहतूक सुरळीत असून अफवा पसरू नयेत, यासाठी काही दिवस इंटरनेट सेवा बंद ठेवण्यात येणार आहे. बदलापूर आणि परिसरातल्या शाळा आज बंद आहेत. रेल रोको आंदोलन करणाऱ्या ३०० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २८ जणांना पोलिसांनी अटक केली असून त्यापैकी २२ जणांना न्यायालयानं १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवलं आहे. या पार्श्वभूमीवर बदलापूर रेल्वे स्थानक परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याची पोलीस कोठडी न्यायालयानं आज २६ ऑगस्टपर्यंत वाढवली. या प्रकरणाच्या चौकशीसाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी आरती सिंह यांच्या नेतृत्वात विशेष तपास पथक नेमण्यात आलं आहे. तर सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्यात येणार आहे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिका, तसंच दोन सेविकांना निलंबित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

बदलापूरमध्ये लहान मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीनं येत्या शनिवारी ‘महाराष्ट्र बंद’ पुकारला असल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सांगितलं. महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर मुंबईत ते वार्ताहरांशी बोलत होते.

राज्यात लहान मुलं, महिलांवरच्या अत्याचाराच्या प्रकरणात अनेक पटींनी वाढ झाली आहे. त्यामुळं हा बंद पुकारल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले.

याच मुद्द्यावर काँग्रेसनं आज मंत्रालयासमोर आंदोलन केलं. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार वर्षा गायकवाड, आमदार अस्लम शेख यांच्यासह अनेक नेते यावेळी उपस्थित होते. राज्य सरकार कायदा सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरल्यानं सरकारनं राजीनामा द्यावा, अशी मागणी वड़ेट्टीवार यांनी केली. याप्रकरणी नियुक्त झालेले विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम हे भाजपाचे आहेत या कारणावरुन त्यांची नियुक्ती रद्द करण्याची मागणी वर्षा गायकवाड यांनी केली.

**<><><><><>**

या अत्याचाराच्या घटनेचे पडसाद आज राज्यात विविध ठिकाणी उमटत आहेत. राज्यात ठिकठिकाणी निदर्शन, आंदोलन केली जात आहेत.

बदलापूर घटनेच्या निषेधार्थ आणि राज्य सरकारच्या विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं **सोलापूर** जिल्हा परिषद पूनम गेट इथं आज निदर्शनं केली. राज्यपालांनी राज्य सरकार बरखास्त करावं, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामे द्यावेत अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं केली. ज्या शिक्षण संस्थेत ही घटना घडली त्याच्या पदाधिकाऱ्यांवर तसंच या प्रकऱणातील आरोपीवर आणि त्याच्याविरोधात कारवाई करायला हलगर्जी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी आंदोलकांनी केली.

**भंडाऱ्यात**ही बदलापूर इथल्या घटनेच्या निषेधार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं त्रिमूर्ती चौकात आंदोलन केलं.

**पुण्यात**ही गुडलक जंक्शन इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे या घटनेच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आलं.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्याच्या पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टिने विमान मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज रत्नागिरीत केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आज रत्नागिरी विमानतळाच्या या नवीन प्रवासी टर्मिनलचं भूमिपूजन करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते.

कोकणात पर्यटनाचा विकास करण्यासाठी रस्ते, रेल्वे, जल आणि विमान अशा चारही प्रकारची वाहतूक सुविधा असणं आवश्यक आहे. परदेशी नागरिकांसाठीही हा मार्ग अतिशय महत्त्वाचा आहे. हे लक्षात घेऊन १०० कोटी रुपयांच्या या टर्मिनलचं भूमिपूजन आज संपन्न झाल्याची माहितीही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

<><><><><>

राज्यशासनाच्या कृषी विभागातर्फे बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ इथं राज्यस्तरीय कृषी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज या महोत्सवाचं उद्धाटन होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार तसंच कृषी मंत्री धनंजय मुंडे कार्यक्रमाला उपस्थित असतील. या महोत्सवात कृषी प्रदर्शन, परिसंवाद, चर्चा सत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, अत्याधुनिक कृषी औजारांचं प्रदर्शन आदी गोष्टींचं आयोजन करण्यात आलं. हा महोत्सव 25 ऑगस्ट पर्यंत चालणार आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान या उद्धाटनसोहळ्याचे प्रमुख पाहुणे असून त्याकरता आज ते विमानानं नांदेड इथं दाखल झाले. यावेळी भाजपा खासदार अशोक चव्हाण आणि अन्य नेत्यांनी त्यांचं स्वागत केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवस पोलंड आणि युक्रेन च्या दौऱ्यावर रवाना झाले. त्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात प्रधानमंत्र्यांनी विश्वास व्यक्त केला आहे, की पोलंड हा मध्य युरोपातला भारताचा महत्त्वाचा भागीदार असून दोन्ही देशांच्या लोकशाही आणि बहुविविधतेविषयी असलेल्या बांधिलकीमुळे परस्परांचे संबंध अधिक दृढ व्हायला मदत होते. पोलंड आणि भारताच्या राजनैतिक संबंधांना ७० वर्षे पूर्ण होत असताना प्रधानमंत्र्यांचा हा दौरा होत आहे. पोलंडची राजधानी वाॅर्सा इथं त्यांच स्वागत करण्यात येणार आहे. पोलंड चे  प्रधानमंत्री  डोनाल्ड टस्क आणि राष्ट्रपती आंद्रेज डूडा  यांची भेट घेऊन ते चर्चा करणार आहेत. तसंच पोलंड मधल्या भारतीयांशी  तसंच व्यापारी आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. ४५ वर्षांनंतर भारताचे प्रधानमंत्री प्रथमच पोलंडला भेट देत असून पोलंड आणि भारतातील जामनगर आणि कोल्हापूर यांच्यातले ऋणानुबंध जपणाऱ्या दोन स्मृति स्थळांना ही मोदी या दौऱ्यात भेट देणार आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी पोलंडमधल्या शरणार्थींनी भारतातल्या या दोन शहरात आसरा घेतला होता.

युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्या निमंत्रणावरून  प्रधानमंत्री मोदी येत्या शुक्रवारी २३ तारखेला युक्रेनला जाणार असून, १९९२ नंतर प्रथमच भारतीय प्रधानमंत्री युक्रेनला भेट देणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांना ग्लोबल फायनान्स सेंट्रल बँकर रिपोर्ट कार्ड २०२४ मध्ये सलग दुसऱ्यांदा ए प्लस रेटिंग मिळाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी त्यांचं अभिनंदन केलं.

आरबीआयनं एक्स समाज माध्यमावरील पोस्टवर प्रधानमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरात आरबीआय गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सलग दुसऱ्यांदा हा सन्मान मिळवल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं. दास यांच्या नेतृत्वाखाली आरबीआयला स्थिरता मिळाली असून आर्थिक विकासाला योग्य दिशा मिळाल्याचंही प्रधानमंत्र्यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

<><><><><>

EPFO, अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेत या वर्षी जूनमध्ये १९ लाख २९ हजार नवीन सदस्यांची नोंदणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत सदस्यसंख्येत ७ पूर्णांक ८६ शतांश टक्क्यांनी वाढ झाली आहे. कामगार आणि रोजगार मंत्रालयानं आज एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली. यात १८ ते २५ वयोगटातल्या सदस्यांची संख्या जास्त आहे, असंही या पत्रकात म्हटलं आहे. संघटनेच्या माहिती नुसार अंदाजे १४ लाख १५ हजार सदस्य बाहेर पडले होते आणि नंतर त्यांनी पुन्हा सदस्यत्व घेतलं.

<><><><><>

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या उपवर्गीकरणाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात देशभरात बंद पाळला जात आहे. राज्यातही हा बंद पाळला जात आहे. भंडारा जिल्ह्यातया बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. शाळा, महाविद्यालयं, तसंच अनेक बाजारपेठा बंद होत्या. विविध सामाजिक संघटना आणि राजकीय संघटनेनं या बंदमध्ये सहभाग घेतला. या आदेशाविरोधात सरकारनं योग्य पाऊल उचलावं, अशी मागणी केली आंदोलकांनी केली.

<><><><><>

निलंबित आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर हिला येत्या २९ ऑगस्टपर्यंत अटक करण्यात येऊ नये, असा आदेश दिल्ली उच्च न्यायालयानं दिला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २९ ऑगस्टला होईल.

<><><><><>

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेतला कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्नील कुसळे याचं जिल्हा प्रशासनाच्या वतीनं आज कोल्हापुरात जल्लोषात स्वागत करण्यात आलं. महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यापासून निघालेल्या स्वागत मिरवणुकीत नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. शालेय विद्यार्थी, खेळाडू देखील सहभागी झाले होते. जिल्हा प्रशासनानं चांदीची गदा, सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन त्याचा भव्य सत्कार केला.

//<><><><><>//